# दुर्गासप्तशतीमधील रूपकात्मक वर्णन

## (पूर्वार्ध)

सौ. हेमलता जोशी

'**दु**र्गासप्तशती' या महान पौराणिक रूपकात्मक ग्रंथामध्ये मानवी जीवनातील आध्यात्मिक भागाशी निगडित असलेले महत्त्वाचे सत्य म्हणजे 'माणसाचे ईश्वराशी नाते आणि त्या परमेश्वराचा शोध घेण्यासाठी त्याच्या अंतर्मनात सतत चालू असलेला संघर्ष' हे होय!

मार्कंडेय पुराणामध्ये 'दुर्गासप्तशती' या महान ग्रंथाचा अंतर्भाव असून त्याचे पठण पुराणकाळापासून आसेतुहिमाचल संपूर्ण भारतात केले जाते. त्यामध्ये ७०० श्लोकांचा अंतर्भाव आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनात कोसळणारी सर्व संकटे, समस्या आणि अडथळे यांचे निवारण करण्यासाठी आणि मदतीसाठी 'शक्तीला' (दिव्य शक्तीला) आवाहन केले आहे, मदतीसाठी तिचा धावा केला आहे, आळवणी केलेली आहे. त्याच कारणासाठी 'दुर्गासप्तशती' या ग्रंथाचा उपयोग केला जातो. पठण केले जाते. याच्याच बरोबर व्यक्तीला वैयक्तिक लाभासाठी, इच्छापूर्तीसाठी आणि वैयक्तिक समाधानासाठी जगदंबेच्या उपासकाला आध्यात्मिक प्रगतीसाठी त्याची फार मोठी मदत होते. या संपूर्ण ग्रंथाचे योग्य आणि बिनचूक पठण आणि त्याच्याबरोबर केलेल्या धार्मिक विधींमुळे उत्तम फलप्राप्ती होते, असा असंख्य हिंदू धर्मीयांचा विश्वास आहे. श्रद्धा आहे. जगदंबेला, शक्तीला प्रसन्न करून वैयक्तिक आणि सामाजिक इच्छा-आकांक्षांच्या परिपूर्तीसाठी सप्तशतीचे पाठ, हवन इत्यादी केले जाते. शारीरिक व्याधी, आर्थिक समस्या आणि असंख्य संकटांतून मुक्ती मिळविण्यासाठी या ग्रंथाचा उपयोग केला जातो.

अशा या बहुमोल ग्रंथाचा उपयोग आध्यात्मिक प्रगतीसाठी होणे जास्त इष्ट असताना केवळ इच्छापूर्तीसाठी आणि संकटनाशनासाठीच त्याचा उपयोग करणे कितपत योग्य आहे? संपूर्ण ग्रंथाचे वाचन केल्यानंतर असे लक्षात येते की, भौतिक सर्वसाधारण जीवनातील आकांक्षापूर्तीसाठी 'दिव्यशक्तीला' आवाहन करण्यासाठी नुसती परवानगी नाही तर स्फूर्ती आणि प्रेरणासुद्धा देणे हाच या ग्रंथाचा हेतू आहे!

पण त्याचबरोबर दुसरा महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे पण तितकेच जरुरीचे आहे. मनुष्याच्या आध्यात्मिक जीवनातील विविध अवस्थांची उकल करणारे, व्यक्त करणारे रूपकात्मक कथानक या ग्रंथात आहे. त्याच्याबरोबर असेही सूचित केले आहे की, या दिव्यशक्तीची आराधना केली असताना तिची भक्तिपूर्वक आळवणी केल्यानंतर साधकाच्या हृदयात या दिव्यशक्तीचा अवतार झाल्यानंतर साधकाला जीवनात येणाऱ्या विविध संघर्षांना तोंड देण्याचे, सामना करण्याचे आत्मिक धैर्य, बळ प्राप्त होते. त्याच्या दुर्बल, क्षीण झालेल्या अवस्थेवर, दोषांवर मात करता येते. आत्मविश्वास निर्माण होतो. त्याच्या आध्यात्मिक प्रगतीच्या विविध अवस्थांमध्ये या सर्वांचा त्याला फायदाच होतो. 'सप्तशती' मधील कथा रूपकात्मक आहे हे सर्वांना विदितच आहे. या ग्रंथाचा सखोल अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणि साधकांच्या सहज लक्षात येते की, ही कथा केवळ कथा म्हणून शब्दशः न घेता त्याच्या पलीकडे जाऊन गर्भितार्थ शोधण्यासाठी घेणे जास्त सयुक्तिक आणि योग्य आहे. ही कथा म्हणजे प्रगतिपथावर असलेल्या व्यक्तीच्या मनात सतत चालत असलेला संघर्ष आहे. ध्येयपूर्तीसाठी ध्येयपथावर चालताना उद्भवणारे मानसिक संघर्ष त्याच्या प्रगतीत अडथळे निर्माण करतात, भिंती तयार करतात किंवा त्याची संपूर्ण प्रगती पूर्णपणे थांबवतात. काही जणांनी या कथेतील विविध घटकांचा संबंध मनुष्य जीवनातील विकासाच्या विविध अवस्थांशी अप्रत्यक्षपणे जोडलेला आहे. अशा स्वरूपाच्या कार्यासाठी संपूर्ण कथेचे अगदी काळजीपूर्वक विश्लेषण करून मग त्यातील विविध भागांचे अंतर्गत वैशिष्ट्य जाणून नंतर त्यांचा संबंध व्यक्तीच्या अथवा समाजाच्या मानवी जाणिवेच्या व्यक्तिकरणाशी जोडणे अथवा शोधणे जरुरीचे ठरते.

दुर्गासप्तशतीच्या रूपकात्मक वैशिष्ट्याचे महत्त्व जाणण्यासाठी प्रथम त्याचा पाया असणारे कथानक, त्याची रचना समजावून

घेणे महत्त्वाचे ठरते. मंत्र्यांच्या कपटकारस्थानांमुळे सुरथ नावाच्या राजाला आपल्या राज्यापासून वंचित व्हावे लागले, तर समाधी नावाच्या वैश्याला त्याच्या कृतघ्न बायका-मुलांनीच घराच्या बाहेर हाकलून दिले. त्यामुळे ते दोघेही अत्यंत दु:खी होतात आणि मेघा नावाच्या ऋषींच्या आश्रमात त्यांच्या दु:खी मन:स्थितीवर उतारा म्हणून सांत्वनासाठी येतात. त्याठिकाणी ते ऋषींना असा प्रश्न विचारतात की, "त्यांच्या दु:खास कारणीभूत असणाऱ्या गोष्टींविषयीच या जगामध्ये राहणाऱ्या लोकांना परत ममत्व का वाटते? ते त्याच गोष्टींना परत कसे जखडून राहतात?" ऋषींनी त्यावर दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे. ते म्हणतात, "मानवी जीवनातील या वैश्विक आणि सर्वसाधारण घटकाविषयी आश्चर्य वाटण्यासारखे काही कारण नाही. या विश्वाच्या निर्मितीचे पायाभूत कारण असणाऱ्या त्या दिव्य शक्तीने, भगवतीनेच अत्यंत ज्ञानी आणि विद्वान व्यक्तींच्या मनावरच असा मायेचा पगडा, आच्छादन घातले आहे. हा सर्व तिच्या अद्‌भुत मायेचाच प्रताप होय. या महामायेची ही अद्‌भुत शक्ती माणसांना संसारचक्रात पुन:पुन्हा अडकवते. त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या दु:खाचे मूळ कारण असणाऱ्या गोष्टींबद्दलच त्यांना पुन:पुन्हा मोह वाटत राहातो." यावर राजाने या दिव्यशक्तीविषयी अनेक प्रश्न ऋषिवरांना विचारले, "ही दिव्यशक्ती कोण आहे? तिचा उद्‌भव कुठून झाला? (ती कुठून आली?) ती कसे कार्य करते?"

राजाच्या या प्रश्नांना उत्तर देताना ऋषिवरांनी या वैश्विक दिव्यशक्तीच्या (दुर्गेच्या) मूलभूत स्वरूपाचे वर्णन केले - पुढे त्यांनी राजा सुरथ आणि वैश्य यांच्या फायद्यासाठी एक कथा पण सांगितली. या देवीचे स्वरूप देवांना मदत करण्यासाठी आणि दुष्ट दैत्यांचे निर्दालन करण्यासाठी वारंवार कसे प्रगट होते, याचे वर्णन त्या कथेमध्ये केले. या दिव्य शक्तीला 'देवी' असेही संबोधिले जाते.

११ व्या अध्यायातील शेवटच्या दोन श्लोकांमध्ये देवीनेच आपल्या पुन:पुन्हा प्रगटित होण्याचा हेतू सांगितला आहे. 'ज्या ज्या वेळी दुष्ट शक्तींचा प्रभाव अतिशय प्राबल्याने माजेल आणि देवांना सुद्धा त्यापासून आपले संरक्षण करता येणार नाही, त्या त्या वेळी त्यांना मदत करण्यास आपण पुन:पुन्हा प्रगट होऊ,' असे वचन खुद्द देवीनेच दिले आहे.

***त्रैलोक्यस्य हितार्थाय वधिष्यामि महासुरम् ।***
***भ्रामरीति च मां लोकास्तदा स्तोष्यन्ति सर्वत: ।।५४।।***
***इत्थं यदा यदा बाधा दानवोत्था भविष्यति ।***
***तदातदावतीर्याहं करिष्याम्यरिसंक्षयम् ।।५५।।***

या श्लोकाचे साधर्म्य भगवद्‌गीतेतील चौथ्या अध्यायातील ७ व्या श्लोकांशी फार विलक्षणरीत्या जुळते.

***यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।***
***अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।७।।***

त्यावरून असेही म्हणता येईल की, दुर्गासप्तशतीतील हे दोन श्लोक म्हणजे भगवत्‌गीतेतील ईश्वराच्या वचनाचेच व्यापक स्वरूप आणि प्रत्यक्ष उदाहरण आहे. "ज्या ज्या वेळी दुष्ट शक्तींचे प्राबल्य माजून मानवी समाजातील व्यवहारात अस्वस्थता निर्माण होते आणि संहारक व विघातक घटना गंभीर स्वरूपात घडून नियंत्रणाच्या बाहेर जातात तेव्हा ईश्वरी शक्तीला शक्तीच्या बळावर मध्यस्थी करावी लागते. दुष्टत्वाचे निर्दालन करण्यासाठी दिव्यशक्तीचे आगमन होते.

'दुर्गासप्तशती' या ग्रंथामध्ये एकूण तेरा अध्याय आहेत – हा ग्रंथ तीन विभागांत विभागला जातो. त्यांचा संबंध 'तीन महत्त्वाच्या प्रसंगी देवीचे तीन स्वरूपात तीन वेळा होणाऱ्या आगमनाशी आहे. पहिल्या भागातील कथेमध्ये प्रलय काळाचे वर्णन आहे. त्यावेळी विश्वाची निर्मिती झालेली नव्हती. त्यावेळी भगवान श्री विष्णू प्रगाढ निद्रेमध्ये गेलेले असून त्यांची बाह्य जाणीव आंतरिक जाणिवेत, सुप्त जाणिवेमध्ये प्रविष्ट झालेली होती. ही यौगिक अवस्था 'समाधी अवस्थेचीच' आहे.. त्यांच्या कर्णातील मळापासून मधु आणि कैटभ या दोन राक्षसांचा जन्म झाला. या बलाढ्य राक्षसांनी विष्णूच्या नाभिकमलामध्ये स्थित असणाऱ्या सृष्टिरचयिता प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाच ठार मारण्याची आणि त्याचे भक्षण करण्याची धमकी दिली. त्यामुळे घाबरलेल्या आणि हतबल झालेल्या ब्रह्मदेवाने भगवान विष्णूच्याच वैशिष्ट्यपूर्ण शक्तीची योगनिद्रेची प्रार्थना केली आणि त्याच्या जीवनाला, अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या या दोन दुष्ट राक्षसांचा संहार करण्यासाठी विनंती केली. या योगमायेचे कार्य म्हणजे भगवान विष्णूंना योगमायेच्या प्रभावातून जागे करणे हे होय! एकदा जागृती आली की मग भगवान विष्णूच या दुष्ट राक्षसांचे निर्दालन करतील.

योगमायेने ब्रह्मदेवाच्या विनंतीला मान देऊन आपले कार्य केले- भगवान श्री विष्णूंना जागृती आणली. जागे होताच भगवान विष्णू हातात कसलेही शस्त्र न घेता नुसत्या हातांनीच या दोन दैत्यांशी युद्ध करू लागले. हे युद्ध पाच हजार वर्षे चालले. शेवटी भगवंतांनी आपल्या मायामोहिनी शक्तीचा वापर केला. त्याचा परिणाम असा झाला की, ते उद्धट दैत्य भगवान विष्णूंनाच म्हणू लागले, "आम्ही तुझा पराक्रम पाहून संतुष्ट झालो आहोत. तेव्हा आमच्याकडून तू एखादा वर मागून घे." या औध्यत्यपूर्ण उद्‌गारातच त्यांच्या सर्वनाशाची बीजे पेरली गेली. भगवान विष्णू त्यांना म्हणाले, "जर संतुष्ट होऊन तुम्ही मला वर देणार असाल तर मी असा वर मागतो की, तुमचा मृत्यू माझ्या हातून घडावा!" अशा रीतीने स्वत:चा मृत्यू टाळण्याच्या दृष्टीने निर्माण केलेल्या

सापळ्यामध्ये ते दुष्ट दैत्य स्वत:हूनच अडकले. त्यांना वाटले की हा वर विष्णूला देताना आपण एक अट टाकू आणि मृत्यूपासून सुटका करून घेऊ. ही अट पूर्ण करणे विष्णूला अत्यंत अशक्य होईल. कारण त्यावेळी त्यांच्या सभोवती प्रचंड जलाशयाने भरलेल्या सागराशिवाय दुसरे काहीच नव्हते. म्हणून ते मोठ्या गर्वाने विष्णूला म्हणाले, "तुला आमचा वध कोरड्या जमिनीवर करावा लागेल!" ही त्यांची अट ऐकल्याबरोबर भगवान विष्णूंनी त्यांना आपल्या मांडीवर पकडले आणि त्यांचे शिरच्छेद केले.

सप्तशतीच्या दुसऱ्या भागात महिषासुरनामक दैत्याच्या वधाची कथा येते. या दैत्याचा जन्म झाल्यानंतर तो इतका शक्तिमान बनला की, त्याने सर्व देवांना स्वर्गातून हाकलून दिले आणि तो स्वत: तिन्ही लोकांचा सम्राट बनला. त्याने देवांचा इतका छळ केला की, शेवटी सर्व देवांनी एक संघटना केली आणि ब्रह्मदेवाच्या नेतृत्वाखाली ते श्री विष्णू आणि श्री शिवाकडे गेले. देवांची तक्रार ऐकल्यानंतर श्री विष्णू आणि श्री शंकर अत्यंत क्रोधित झाले. त्या क्रोधामुळे त्यांच्या शरीरातून अत्यंत दिव्य स्वरूपाचे प्रखर तेज बाहेर पडले. त्याचप्रमाणे इतरही देवांच्या शरीरांतूनही प्रखर तेज बाहेर पडले. हे सर्व प्रखर स्वरूपाचे दिव्य तेज एकत्र झाले आणि त्यांचे रूपांतर एका अत्यंत तेजस्वी नारीस्वरूपी देवीमध्ये झाले. त्या देवीचे तेज एवढे प्रखर होते की, त्या तेजाने संपूर्ण विश्व भरून गेले. त्यानंतर प्रत्येक देवाने या देवीला आपले शस्त्र आणि अलंकार भेट म्हणून दिले. अशा रीतीने सर्व शस्त्रालंकारांनी नटलेल्या देवीने प्रचंड गर्जना करण्यास सुरुवात केली. त्या प्रचंड गर्जनांनी सारे अवकाश व्याप्त झाले.

हा प्रचंड निनाद ऐकल्यानंतर महिषासुराने ताबडतोब आपले सर्व सैन्य गोळा केले आणि हा आवाज मुळातून कोठून आला आणि कोणी केला, हे पाहण्यास तो सज्ज झाला. त्यावेळी सर्व दिशांना आपल्या भुजा पसरून गर्जना करणारी देवी त्याने पाहिली. तिच्या सर्व भुजांमध्ये सर्व प्रकारची शस्त्रे होती. दैत्यांनी ताबडतोब देवीवर हल्ला चढवला आणि प्रचंड युद्धाला तोंड लागले. यानंतर दैत्य कसे क्रूरपणे लढले. देवीच्या सर्व श्वासांचे रूपांतर विविध शस्त्रे धारण करणाऱ्या योद्धांमध्ये होऊन युद्ध पेटल्यानंतर सर्व दैत्य सैन्याची कशी धूळधाण झाली, याचे रसभरीत वर्णन विविधरंगी भाषेमध्ये केले आहे. जेव्हा आपल्या सैन्याचा फडशा पडताना महिषासुराने पाहिले तेव्हा त्याने महिषाचे रूप घेतले आणि तो देवीवर धावून गेला. तिने ताबडतोब तिचा दोरखंडाचा फास त्याच्या गळ्याभोवती फेकला आणि त्याला बद्ध केले. त्यानंतर महिषासुराने निरनिराळ्या भेसूर प्राण्यांची रूपे एकामागून एक याप्रमाणे घेतली आणि देवीवर हल्ले चढवले. शेवटी तर त्याने वरचा भाग मनुष्याचा आणि खालचा भाग रेड्याचा असे रूप धारण करीत असतानाच देवीने त्याला आपल्या तीक्ष्ण भाल्याने भोसकले आणि त्याचे मुंडके कापून टाकले. त्याबरोबर उरलेले सर्व दैत्य पाताळात पळाले. सर्व देवांनी आणि ऋषिमुनींनी देवीवर पुष्पवृष्टी करून आनंद व्यक्त केला, तिची पूजा केली आणि तिच्या पराक्रमाचे कौतुक करणारी स्तुतिस्तोत्रे गाण्यास प्रारंभ केला. जेव्हा देवीने त्यांना विचारले, "तुमचे काय मागणे आहे?" तेव्हा ते म्हणाले, "महिषासुराचा वध करून तू आमच्या संकटांचा आणि दु:खाचा शेवट केला आहेस. परंतु हे जगदंबे, माते, तू प्रसन्न होऊन आम्हाला जर वर देत असशील तर आमची इच्छा पूर्ण कर. ज्या ज्या वेळी संकटकालात सापडल्यानंतर आम्ही तुझे स्मरण करू, तुझा धावा करू, त्या त्या वेळी तू आमचे रक्षण करण्यासाठी अत्यंत आनंदाने प्रगट हो! त्याचप्रमाणे जे तुझी स्तोत्रे गाऊन तुझी आराधना करतील त्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करून तू त्यांचे कल्याण कर." देवीने त्यांची प्रार्थना स्वीकारून त्याप्रमाणे त्यांना वर दिला आणि ती अदृश्य झाली. या ठिकाणी कथानकाचा दुसरा भाग संपतो.

कथेचा तिसरा भाग प्रदीर्घ असून रूपकात्मक दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामध्ये शुंभ आणि निशुंभ अशा दोन दुष्ट दैत्यांच्या संहारासाठी जगदंबेचा (देवीचा) पुन्हा अवतार झालेला आहे. हे दोन दैत्यसुद्धा असेच बलाढ्य झाले. त्यांच्या आसुरीशक्तीने खूप माजले. सर्व देवांना स्वर्गातून हाकलून देऊन पुन्हा त्यांनी आपल्या शक्तीचा गैरवापर करण्यास सुरुवात केली. देवांनासुद्धा देवीने त्यांना दिलेल्या पूर्वीच्या वचनाची आठवण झाली. त्यांनी पुन्हा एकवार तिची अत्यंत श्रद्धायुक्त अंत:करणाने प्रार्थना केली. तिला पुन्हा परत येण्यासाठी विनविले आणि त्यांच्यावर कोसळलेल्या आपत्तीतून त्यांचे संरक्षण करण्याची आणि त्या संकटाचा शेवट करण्याची प्रार्थना केली. देवी 'पार्वती' च्या स्वरूपात त्यांच्यासमोर आली आणि तिने त्यांना विनंती करण्याचे, स्तुतिस्तोत्रे गाण्याचे कारण विचारले. देवांच्या विनंतीचे कारण समजताच तिच्या शरीराचा एक भाग बाहेर पडून त्याचे रूपांतर एका अतिशय सुंदर देवीमध्ये 'अंबिके'मध्ये झाले तर दुसऱ्या बाहेर पडलेल्या भागाचे रूपांतर काळ्याकुट्ट आणि भेसूर अशा कालिकेच्या स्वरूपात झाले.

चंड आणि मुंड या दोन दैत्यांनी अंबिकेला पाहिले. आणि तिच्या अवर्णनीय सौंदर्याचे वर्णन शुंभ दैत्याजवळ केले. शुंभाने ताबडतोब सुग्रीवाला तिच्याकडे दूत म्हणून ताबडतोब जाण्याची आज्ञा केली आणि अत्यंत कुशलतापूर्वक तिचे मन वळवून आपल्या अंतर्गृहात पत्नी म्हणून दाखल होण्याविषयी सांगितले. जेव्हा सुग्रीवाने शुंभाचा निरोप अंबिकेला दिला तेव्हा तिने दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे. "मी व्रतस्थ आहे. जो माझ्याशी युद्ध

करून मला रणांगणात जिंकेल आणि माझे गर्वहरण करील अशाच पुरुषाला मी वरेन. मी त्याच्याशी लग्न करेन. जर शुंभाला माझ्याशी विवाह करायचा असेल तर त्याने येथे यावे आणि युद्ध करून प्रथम माझा पराभव करावा!''

शुंभाने जेव्हा देवीचा हा प्रस्ताव ऐकला तेव्हा तो अत्यंत प्रक्षुब्ध झाला आणि त्याने धूम्रलोचनाला सैन्यासह देवीवर हल्ला चढवून जबरदस्तीने तिला खेचून आणण्याची आज्ञा केली. त्याचा परिणाम म्हणजे घनघोर युद्ध होऊन त्यामध्ये धूम्रलोचनाचा मृत्यू झाला आणि त्याचे संपूर्ण सैन्य नष्ट झाले. यानंतर चंड आणि मुंड या दैत्यांच्या नेतृत्वाखाली दुसरी सैन्याची मोठी फौज पाठविण्यात आली. पण तिचाही धूम्रलोचनाच्या सैन्याप्रमाणेच पूर्ण फडशा पडला. देवीने उच्चारलेल्या नुसत्या 'हुंकारा' बरोबर चंड मारला गेला. त्यानंतर शुंभाने रक्तबीजाला आणखी मोठे सैन्य घेऊन देवीवर हल्ला करण्यास फर्मावले.

पण युद्ध सुरू होण्यापूर्वी देवीने शिवाला शुंभ आणि निशुंभाकडे दूत म्हणून पाठवले आणि पुढील संदेश दिला, ''जर तुला जिवंत राहायचे असेल तर स्वर्गाचे राज्य देवांना दे आणि सर्व दैत्यांना पाताळात जाण्यास सांग, नाहीतर तुझा वध निश्चित आहे असे समज!'' त्या दोन दैत्यांनी देवीच्या या निरोपाकडे दुर्लक्ष करून ताबडतोब युद्धाला सुरुवात केली. त्यानंतर झालेल्या घनघोर संग्रामामध्ये देवांनी त्यांच्या सर्व शक्ती देवीच्या मदतीसाठी पाठवल्या. त्या प्रत्येक शक्तीचे स्वरूप हुबेहुब त्या देवाप्रमाणेच होते. पुन्हा एकदा सर्व दैत्यसैन्य संपूर्ण उद्ध्वस्त झाले आणि रक्तबीज पण युद्धांत मारला गेला.

जेव्हा शुंभाचा भाऊ निशुंभसुद्धा मारला गेला तेव्हा मात्र चवताळलेला, प्रक्षुब्ध झालेला दैत्यांचा राजा शुंभ स्वत: रणांगणात प्रवेशला आणि सर्व प्रकारच्या शस्त्रांसह घनघोर लढा देण्यास त्याने सुरुवात केली. जेव्हा त्याचा प्रभाव पडणे अशक्य झाले तेव्हा त्याने देवीला टोमणा मारला, ''तुला तुझ्या शौर्याचा, पराक्रमाचा फार गर्व झाला आहे. पण तुझ्या यशाचे रहस्य तू इतरांकडून घेत असलेल्या शक्तीवर अवलंबून आहे. ते तुझे यश नाहीच!'' आता मात्र देवीने त्याला सडेतोड उत्तर दिले, ती म्हणाली, ''मी एकच आहे. माझ्याशिवाय या ठिकाणी दुसऱ्या कोणाचेही अस्तित्व येथे नाही. नीट बघ. ही सर्व माझीच रूपे आहेत आणि आत्ता या क्षणीच मी त्यांना परत माझ्याच स्वरूपात अंतर्भूत करीत आहे. आता मी एकटीच तुझ्याशी संघर्ष करण्यासाठी सज्ज आहे.'' तिने हे उद्‌गार काढल्याबरोबर देवांकडून आलेल्या निरनिराळ्या शक्ती ताबडतोब अदृश्य झाल्या. आता देवी एकटीच रणांगणावर उभी राहिली. त्यानंतर मात्र देवी आणि शुंभाची वैयक्तिक लढाई सुरू झाली. त्यामध्ये सर्व प्रकारच्या शस्त्रांचा वापर झाला. शेवटी सर्व शस्त्रे नष्ट होऊन युद्ध गुद्द्यांच्या, ठोशांच्या लढाईवर आले. शेवटच्या क्षणी तर शुंभ आकाशात उडाला आणि आकाशातून त्याने देवीवर हल्ला चढवला. पण देवीने अत्यंत शौर्याने त्याचे सर्व हल्ले परतवून लावले आणि शेवटी त्याला ठार मारले. या ठिकाणी दुर्गासप्तशतीची कथा संपते. हे या कथेचे बाह्य अंग झाले.

परंतु त्या ग्रंथाचे वाचन करणाऱ्या सुज्ञ वाचकाच्या अथवा साधकाच्या हे सहज लक्षात येते की, ही कथा काही महत्त्वाच्या सत्याविषयीचे रूपकात्मक प्रतिनिधित्व करते. त्यातील गूढ गर्भितार्थ अतिशय महत्त्वाचा आहे. असे आंतरिक वैशिष्ट्य नसेल तर ही एक अर्थशून्य पौराणिक कथा ठरून तिचा सत्य जीवनाशी काहीच संबंध राहणार नाही. पण त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की, या रूपकाचा अर्थ लावणे आणि त्याचा सत्याशी संबंध जोडणे हे सहज सोपे नाही.

मनुष्याच्या जाणिवेच्या व्यक्तिकरणाच्या विविध अवस्थांचे ज्यांना थोडेफार ज्ञान आहे अशांच्या हे ताबडतोब लक्षात येईल की, दुर्गासप्तशतीमध्ये माया, मर्यादा आणि कनिष्ठ जगातील गोष्टींविषयी वाटणारे ममत्व अथवा आकर्षण यापासून मुक्त होऊन मोक्षाकडे (अंतिम सत्याकडे) जाण्याच्या मानवी जागृतीचा रूपकात्मक शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणत्याही गर्भावस्थेतील अपरिणत आत्म्याच्या उत्क्रांतीच्या, विकासाच्या प्रक्रियेमध्ये या मर्यादा, मायामोहाचे आकर्षण आणि माया व भ्रम यांचा अडथळा हा आवश्यक भाग आहे. या बाह्य स्वरूपाच्या भ्रांतिमायामूलक गोष्टींशी संघर्ष करण्यासाठी लागणारी शक्ती आणि सामर्थ्य तयार होण्यासाठी आणि मोक्षाकडे नेणारे खरे दिव्य स्वरूप जाणण्याची परिपक्वता येण्यासाठी वरील स्वरूपाचे अडथळे येणे आवश्यकच आहे.

जीवात्म्याचे मूळ स्वरूप खऱ्या अर्थाने स्वर्गीय, ईश्वरीय आहे. परंतु खालच्या दर्जाच्या जगात त्याचे अवतरण झाल्याबरोबर त्याच्या मूळ ईश्वरी स्वरूपाच्या जाणिवेचा संबंध तुटतो. त्यामुळे या जगात त्यांची पुन्हा होणारी उत्क्रांती आध्यात्मिक अंधकाराच्या अवस्थेत होते. त्यामुळे बौद्धिक विकासाची बऱ्यापैकी उच्च पातळी आणि परिपक्वता गाठल्यानंतर आध्यात्मिक उत्क्रांतीच्या क्षेत्रात उतरण्यास तो योग्य झाल्यावर त्याला सुरुवातीलाच या मार्गावर पहिली अडचण, पहिला अडथळा पार करावा लागतो. त्याला या अडचणीला तोंड द्यावे लागते. त्याचे व्यक्तिमत्त्व हेच त्याच्या आध्यात्मिक प्रगतीचे, उत्क्रांतीचे साधन म्हणून जरी असले तरी त्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्या मूलभूत दिव्य स्वरूपाशी असलेला संबंधच तुटलेला असल्यामुळे त्याला आपल्या मूळ स्वर्गीय मूलस्रोताची अजिबात जाणीवच नसते. तसेच 'आपल्याला

काही स्वर्गीय, दिव्य स्वरूपाचे प्रारब्ध पूर्ण करायचे आहे' हीही जाणीव अजिबात नसते. त्याची बुद्धी (आंतरिक जाणीव) कार्यरत झालेली नसते, विवेकाचा (सारासार निर्णयबुद्धी) तर जन्मच झालेला नसतो. याचा परिणाम असा होतो की, उत्क्रांतीच्या उच्च पातळीवर जाण्याची त्याची तयारी असताना आणि त्याची बुद्धी अतिशय श्रेष्ठ दर्जाच्या पातळीवर विकसित झाली तरी त्याचा आध्यात्मिक आत्मा मात्र त्याच्या अज्ञानी, अप्रकाशित आणि स्वच्छंदी (दुसऱ्याचे न ऐकणारा, हट्टी स्वरूपाचा) स्वरूपाच्या व्यक्तिमत्त्वात बंदिस्त झालेला असतो. त्यातून सुटका करून घेण्याचे, मुक्ती मिळविण्याचे कोणतेही साधन त्याच्याजवळ नसते.

दोन प्रकारच्या धोक्यांची भीती, दहशत या ठिकाणी उद्‌भवते. शाश्वत आनंदाचा (सुखाचा) आणि शक्तीचा (सत्तेचा) व्यक्तीकडून होणारा पाठलाग! अशा स्वरूपाच्या आध्यात्मिक प्रलयाच्या परिस्थितीखाली त्याचे उच्च दर्जाच्या पातळीवरचे मन (कनिष्ठ आणि उच्च पातळीवर असणाऱ्या मनाचा पूल) श्री भगवान विष्णू प्रतिनिधित्व करीत असलेल्या वैश्विक चातुर्याला, सुज्ञतेला, त्या व्यक्तिमत्त्वाला प्रकाशित करण्यासाठी मन:पूर्वक विनंती करते आणि अशा रीतीने आध्यात्मिक उत्क्रांतीची शक्यता निर्माण होते.

कथेचा पहिला भाग नेमक्या याच अवस्थेचे प्रातिनिधिक स्वरूप आहे. ब्रह्मदेव हे वैश्विक मनाचे प्रतीक आहे, म्हणजेच ते उच्च पातळीवरील सूक्ष्म अशा श्रेष्ठ मनाचेही प्रतीक आहे. असे हे मन श्री भगवान विष्णू म्हणजे साक्षात वैश्विक शहाणपण, सुज्ञतेस मधु आणि कैटभ या दोन दैत्यांचा नाश करण्याची प्रार्थना करते. विष्णूची जागृती म्हणजे मनुष्याचा सारासार विवेकशक्तीचा, योग्यायोग्य भेद करण्याच्या कुवतीचा जन्म होय. जेव्हा बुद्धीचा प्रकाश माणसाचे मन प्रकाशित करतो, उजळून टाकतो, तेव्हा तो आत्मसंतुष्टतेची, समाधानाची भावना नष्ट करतो. इतकेच नव्हे तर व्यक्तीला सर्वसाधारण मानवी जीवनाच्या मर्यादा आणि भ्रामकता काही प्रमाणात ओळखण्यास, बघण्यास लावतो. त्याचबरोबर सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तीच्या आध्यात्मिक स्वरूपाचे मर्म उलगडण्याची अत्यंत तातडीची गरज जाणण्यास प्रवृत्त करतो. अशा प्रकारे जीवात्म्याच्या उत्क्रांतीचा आणि मुक्ततेच्या उच्चतम अवस्थेचा मार्ग, दरवाजा खुला होतो, उघडला जातो.

या कथेतील मनोरंजक आणि लक्ष्यवेधी मुद्दा म्हणजे ब्रह्मदेवाचे दोन शत्रू- मधु आणि कैटभ हे होत. ते काय करतात? ते त्यांच्या भ्रामक मोहात भगवान विष्णूलाच त्यांच्याकडून वर मागून घेण्यासाठी सांगतात आणि स्वत:चा सर्वनाश ओढवून घेतात. या कृतीचा अर्थ कसा लावायचा? मधु आणि कैटभ म्हणजे मानवी मनाच्या क्षुद्र प्रवृत्ती आहेत. माणसाचे क्षुद्र आणि स्वार्थी मन सुखाच्या प्राप्तीच्या हव्यासासाठी, सत्तेच्या अभिलाषेसाठी आणि उच्चतम आध्यात्मिक जगताचे लक्ष वेधून घेण्यासाठी योग्यायोग्यतेचा भेद जाणणाऱ्या शक्तीचा दरवाजा उघडून सातत्याने वापर करीत असते. माणसे आध्यात्मिक उन्नतीच्या पथावर प्रत्यक्षपणे आणि सहजासहजी प्रवेश करीत नाहीत असा सर्वसाधारण अनुभव आहे. सूक्ष्म जगतातील सुखाची, आनंदाची आणि सत्तेची प्राप्ती मिळविण्याच्या अनिवार इच्छेपायी ते हळूहळू या मार्गाकडे आकर्षित होतात. या मार्गावर ओढले जातात. या ठिकाणी सूक्ष्म जगत् म्हणजे सनातनी धार्मिक लोकांच्या मताप्रमाणे स्वर्ग असा आहे. 'स्वर्ग' म्हणजे शाश्वत सुखाचे, आनंदाचे परमोच्च निधान अशी पारंपरिक समजूत आहे. या सुखाबरोबरच सिद्धींचा विकास करूनही आपले स्वार्थी हेतू पूर्ण करण्याची त्यांची तीव्र इच्छा असते. त्या सिद्धी मिळविण्यासाठीसुद्धा ते आध्यात्मिक मार्गाकडे आकर्षित होतात. सर्वश्रेष्ठ आणि उच्चतम जगातील (स्वर्गातील) आनंद उपभोगण्याची तीव्र उत्सुकता आणि इच्छा यांच्या मोहापायी माणसाचे क्षुद्र मन वर्धमानित स्वयंशिस्तीचे आणि शुद्धीकरणाचे पालन करण्यास तयार होते. त्यांचा अवलंब करून योग्यायोग्य भेद जाणण्याचे चातुर्य, शक्ती धारण करण्यासाठी मनाला योग्यता प्राप्त करून देते (तपश्चर्या, व्रते केली जातात.). जेव्हा खरेखुरे ज्ञान प्राप्त होते, खरीखुरी सारासार न्याय करणारी, योग्यायोग्यतेचा भेद जाणणारी बुद्धी प्राप्त होते, तेव्हा ती सुखप्राप्तीच्या लाभाची आणि क्षुद्र जीवनातील सिद्धिलाभाची इच्छा, वासनाच मुळी नष्ट करते. त्याच्याबरोबर सूक्ष्म जगतातील आनंदप्राप्तीची वासनाही नष्ट होते.

सत्यशोधाची इच्छा इंद्रियाला दृग्गोचर होणाऱ्या जगतापेक्षा वरचढ होऊन इतर सर्व इच्छांना बाजूला सारून त्यांची जागा घेते. भगवान विष्णूने मधु आणि कैटभ या दैत्यांचा संहार केला, नाश केला. चिरंतन सुखाच्या आणि सामर्थ्याच्या कपटी, स्वार्थी आणि सूक्ष्म शक्तीची इच्छाच त्यांच्या नाशाला कारणीभूत ठरली. हे प्रतीक या कथेत प्रत्ययाला येते.

योग्यायोग्य भेद करण्याची कुवत पुरेशा प्रमाणात विकसित झाली. आध्यात्मिक प्रगती होण्याची शक्यता निर्माण झाली. साधकाच्या मार्गातील सर्वांत प्रथम येणारी मोठी समस्या म्हणजे त्याच्या स्वत:च्या क्षुद्र, कनिष्ठ पातळीवरील पशुतुल्य नैसर्गिक प्रवृत्ती आणि क्षुद्र मनाची अनिष्ट, दु:खदायक प्रवृत्तींकडे असणारी ओढ! कारण योग्यायोग्य भेद जाणण्याची कुवत फक्त आकलनाची किंवा पाहण्याची शक्ती देते, पण त्या विशिष्ट गोष्टीवर अथवा घटनेवर नियमन करण्याची (कंट्रोल करण्याची) शक्ती देत नाही. जेव्हा साधकाला त्याचे जीवन बदलण्याची गरज वाटते आणि आध्यात्मिक मार्गावर चालण्याची इच्छा होते, तेव्हा त्याच्याच व्यक्तिमत्त्वातील क्षुद्र पातळीवरील प्रवृत्ती आणि त्यात पूर्णपणे बुडालेल्या त्याच्या क्षुद्र इच्छा त्याच्या मार्गात अडथळे निर्माण

करीत आहेत असे त्याच्या लक्षात येते आणि याच ठिकाणी मनुष्याच्या क्षुद्र, कनिष्ठ पातळीवरील व्यक्तिमत्त्वाचा आणि उच्च दर्जाच्या पातळीवरील व्यक्तिमत्त्वाचा संघर्ष सुरू होतो. हा संघर्ष, हा लढा नानाविध स्वरूपाचा असतो. त्यामध्ये त्याला एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढावे लागते. हा लढा लढण्यासाठी त्याला अनेक प्रकारच्या निसर्गदत्त शारीरिक आणि मानसिक शक्तींची तसेच सिद्धींची (कौशल्याची) गरज भासते. अगदी सुरुवातीच्या प्रारंभकाळात जेव्हा त्याचा अभिमान आणि अहंकार शक्तिमान वा सामर्थ्यवान असतो तेव्हा अशा विविध स्वरूपी बहुविध लढाया खेळताना तो पूर्णपणे आपल्या स्वत:च्या मानसिक सामर्थ्यावर अवलंबून राहू शकतो. पण एक महत्त्वाची गोष्ट त्यानंतर त्याच्या ताबडतोब लक्षात येते, 'जरी या संघर्षात आत्मविश्वास आणि आत्मसामर्थ्य यांची गरज लागली तरी त्याच्यामध्ये सुप्त अवस्थेत असलेल्या आध्यात्मिक शक्तींना जागृत केल्याशिवाय, त्यांची स्तुतिपर प्रार्थना केल्याशिवाय यश मुळीच प्राप्त करता येणार नाही!' ही गोष्ट एकदा लक्षात आल्यानंतर आपल्या मनाच्या उच्च पातळीच्या मदतीने आणि त्या मनाच्या मार्गदर्शनाखाली त्याने हे रहस्य उलगडण्याचे कार्य सुरू केलेले असते. त्यासाठी तो या सुप्तावस्थेतील अप्रकट (गुप्त) आध्यात्मिक शक्तींना आणि मनाच्या निसर्गदत्त शक्तींना जागृत करतो. मदतीसाठी आणि संरक्षणासाठी त्यांची आळवणी करतो. यानंतरची कृती म्हणजे या जागृत झालेल्या शक्तींचा उपयोग तो त्याच्या क्षुद्र पातळीवरील निसर्गदत्त इच्छापूर्ती करण्यासाठी हळूहळू करण्यास शिकतो.

जेव्हा या सुप्त अप्रकट आध्यात्मिक शक्ती खरोखरीच जागृत होऊन त्याच्या मदतीला येतात तेव्हा तो स्वत:च्या कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तिमत्त्वावर वर्चस्व मिळवतो. आपले प्राबल्य प्रस्थापित करतो.

खरा आत्मविश्वास किंवा खरे स्वावलंबित्व म्हणजे आपल्या क्षुद्र स्वरूपाच्या आत्मतत्त्वावर अवलंबून राहणे नसून दैवी स्वरूपाच्या– ईश्वरी स्वरूपाच्या उच्च दर्जाच्या आत्मतत्त्वावर अवलंबून राहणे होय. असे हे दैवी, स्वरूपाचे आत्मतत्त्व प्रत्येक मानवी व्यक्तीच्या हृदयात भरलेले असते. ही लढाई दीर्घकालीन स्वरूपाची असून काही वेळा तिचे स्वरूप अत्यंत उग्र स्वरूपाचे होते! पण जर साधकाने संयम आणि चिकाटी सातत्याने राखली आणि त्याच्या आंतरिक दैवी शक्तीवरचा विश्वास जर ढळू दिला नाही तर त्याच्या व्यतिमत्त्वातील खालच्या दर्जाचा क्षुद्र व्यक्तिमत्त्वाचे अस्तित्व आपोआप पराभूत होते आणि त्याच्या आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गात अडथळा बनून प्रतिबंध करण्याची कृती संपुष्टात येते. म्हणजेच हा अडथळा नष्ट होतो! प्रथमावस्थेतील हा फार मोठा अडथळा पार केला तरी साधकाला अजून अनेक अडथळे पार करायचे असतात, सूक्ष्म पातळीवरील अनेक शत्रूंना जिंकायचे असते. पण त्यासाठी त्याला आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वातील तामसिक प्रवृत्तींचा नाश करण्याचे सामर्थ्य वाढविण्याची गरज असते. कारण त्यासाठी आवश्यक असणारे परिवर्तन स्वत:च्या आंतरिक स्वरूपात तो घडवित असताना या प्रवृत्ती त्याचे सर्व प्रयत्न हाणून पाडत असतात.

महिषासुराच्या कथेचा रूपकात्मक अर्थ अशा तऱ्हेने लावता येतो. आपल्या आंतरिक आध्यात्मिक प्रगतीचेच आणि लढ्याचेच हे प्रतिकात्मक स्वरूप आहे. हे रूपकात्मक वैशिष्ट्य पुढील मुद्यांवरून स्पष्ट होते.

सर्वप्रथम सर्व देव श्री विष्णू आणि शिव यांच्याकडे ब्रह्मदेवाच्या नेतृत्वाखाली जातात आणि महिषासुराच्या जुलूमशाहीपासून त्यांची मुक्तता करण्यासाठी प्रार्थना करतात. ही दृष्टांतरूपी पद्धत वापरण्याचा हेतू असा आहे की, साधक अजूनही बुद्धीच्या प्रांतात, बुद्धीच्या फार मोठ्या प्रभावशाली पगड्यातच अडकलेला असून त्याच्या आध्यात्मिक शक्तीचा अथवा कार्यक्षमतेचा उदय झालेला नाही. त्या शक्तीचा उलगडा अजून झालेला नाही. आध्यात्मिक अथवा दैवी जगताशी प्रत्यक्ष संबंध जोडण्याचा कोणताही सुलभ रस्ता त्याला शक्य नाही. केवळ उच्च पातळीवरील मनाच्या स्फूर्तीच्या मार्गदर्शनाखाली त्याच्या आध्यात्मिक शक्तींची उकल किंवा जागृती करण्यासाठी हा प्रयत्न चालू आहे.

मदतीसाठी अत्यंत प्रामाणिकपणे रुदन आणि प्रार्थना केल्यानंतर साधकाच्याच हृदयात गुप्त असलेल्या, दडलेल्या आध्यात्मिक राज्याचा प्रतिसाद हा निश्चित स्वरूपाचाच आहे. त्याचा परिणाम म्हणजे आध्यात्मिक जाणिवेची, क्रमाक्रमाने, हळूहळू होणारी जागृती. या जागृतीला मदत करणाऱ्या शक्तींचा, सामर्थ्याचा विकास पण तशाच प्रकारे क्रमाक्रमाने होत जातो. या अवस्थेमध्ये एकाच सर्वोत्तम श्रेष्ठ शक्तीच्या स्वरूपापासून फक्त विलग झालेल्या इतर असंख्य शक्तींची अत्यंत गरज असते. कारण हातात घेतलेले कार्य पूर्ण करताना त्याचे विपुल तसेच बहुढंगी व बहुरंगी स्वरूप लक्षात घेणे महत्वाचे ठरते.

त्याच्या जोडीला वरील विविध शक्तींच्या उपयोगाचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे आध्यात्मिक शक्तींचा वापर अभिन्नत्वाने करण्याच्या दृष्टीने अजून साधकाची पुरेशी प्रगती अथवा विकास झालेला नसतो. अशा तऱ्हेच्या विविध देवतांपासून प्राप्त झालेल्या संमिश्र आणि अस्पष्ट आध्यात्मिक शक्ती वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत झालेल्या या रूपकात्मक कथेत दिसतात. त्यांच्या साहाय्याने साधकाच्या व्यक्तिमत्त्वाचा कनिष्ठ दर्जाचा भाग जिंकला जाऊन साधकाच्या आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग खुला होतो.

# दुर्गासप्तशतीमधील रूपकात्मक वर्णन

## (उत्तरार्ध)

सौ. हेमलता जोशी

कथेतील या भागाच्या दोन लक्षवेधी स्वरूपांचे महत्त्व जाणणे आवश्यक ठरते. पहिला भाग म्हणजे देवीशी लढताना आणि शेवटी देवीने फेकलेल्या भाल्याने भोसकल्यानंतर आणि वध होण्याअगोदर महिषासुराने धारण केलेली विविध रूपे! त्याने एकामागून एक धारण केलेली पशूंची रूपे म्हणजे रेडा, सिंह ही माणसाच्या हिंस्र आणि पशुतुल्य प्रवृत्तींचीच विविध रूपे आहेत. त्या रूपांचे प्रतिनिधित्व येथे केलेले आहे. ती त्या पशुतुल्य वृत्तींचीच प्रतीके आहेत. हिंस्र प्राण्याच्या स्वरूपातून बाहेर आलेली मानवीस्वरूपी आकृती म्हणजे माणसाचेच खालच्या दर्जाचे क्षुद्र मनच असे निश्चित समजावे. त्यावेळी विकासाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये हे मानवी मन फक्त क्षुद्र वासनांचे आणि इच्छाशक्तीचे एक साधन असते. अशावेळी उच्च स्तरावरील अथवा पातळीवरील व्यक्तिमत्त्वाच्या पातळीवर जाण्याचे ते नाकारते, त्या प्रक्रियेला विरोध करते.

या कथेचा दुसरा महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. तो म्हणजे ज्या ज्या वेळी संकटकाळात देव जगदंबेचे स्मरण करतील आणि संकटापासून रक्षण करण्यासाठी तिची प्रार्थना करतील त्या त्या वेळी त्यांच्यासमोर प्रगट होण्याचे देवीने देवांना दिलेले वचन! हे कशाचे प्रतीक आहे? साधकाच्या हीन पातळीवरील खालच्या दर्जाच्या स्वत्वाचा मृत्यू (नाश) झाल्यानंतर मगच तो उच्च पातळीवरच्या स्वत्वाच्या स्तरावर प्रत्यक्ष जाण्याच्या स्थितीपर्यंत पोहोचतो आणि मग त्याच्या अंतर्मनातूनच त्याला जेव्हा जेव्हा गरज लागेल आणि तो मागेल तेव्हा आंतरिक शक्तीचे साहाय्य मिळत राहते. अशा रीतीने आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या उच्च दर्जाच्या स्वत्वापासून (आंतरिक प्रेरणेतून) सरळ सरळ प्रत्यक्ष रीतीने मार्गदर्शन आणि मदत मिळविण्याचे सामर्थ्य प्राप्त होणे. ही आध्यात्मिक विकासाच्या प्रागतिक अवस्थेची निश्चित खूण आहे, चिन्ह आहे. श्रेष्ठ दर्जाच्या योगपथावरील मार्ग आक्रमित असताना हे सामर्थ्य अनिवार्य आणि अत्यंत आवश्यक आहे. पण अशा स्वरूपाचा खास हक्क, अधिकार हीन दर्जाच्या व्यक्तिमत्त्वाचा शेवट झाल्यानंतरच प्राप्त होतो अथवा उच्च दर्जाचे व्यक्तिमत्त्व प्राप्त करण्याची अत्युत्कट इच्छा असल्यावरच हा खास विशेषाधिकार प्राप्त होतो. जेव्हा माणसाचे हीन व्यक्तिमत्त्व नियंत्रणाखाली नियंत्रित केले जाते, शुद्ध केले जाते आणि श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्तिमत्त्वाचे केवळ एक साधन म्हणून वापरले जाते, तेव्हा या हीन दर्जाच्या व्यक्तिमत्त्वाचा मृत्यू होतो अथवा शेवट होतो असे म्हणता येईल.

कथेचा तिसरा भाग हा प्रदीर्घ असून आध्यात्मिकदृष्ट्या अधिक महत्त्वाचा आणि अर्थपूर्ण आहे. जेव्हा बुद्धीचा प्रकाश अथवा योग्यायोग्य भेद जाणण्याची कुवत अविचल वृत्तीने मनाला प्रकाशित करते आणि साधकाचे क्षुद्र, हीन दर्जाचे व्यक्तिमत्त्व जेव्हा पूर्णपणे जिंकले जाते, नरम पडते तेव्हाच खऱ्या आध्यात्मिक प्रगतीची उकल होते. या दृष्टीने या तिसऱ्या भागाचे महत्त्व अपेक्षितच आहे. पहिल्या दोन भागांमध्ये खऱ्या कार्याची पार्श्वभूमी अथवा पाया तयार करण्याचे कार्य झाले आहे तर तिसऱ्या भागात त्या कार्याचा प्रत्यक्ष अवलंब, प्रत्यक्ष कृतियुक्त प्रयोग सुरू झालेला आहे.

तिसऱ्या भागातील या कथेची सुरुवातसुद्धा पुन्हा एकवार सर्व देवांनी या दिव्यशक्तीची स्तुतिस्तोत्रे गाऊन आळवणी केल्यावर, प्रार्थना केल्यावर होते. या प्रसंगी शत्रू निराळे आहेत आणि दिव्यशक्तीची, जगदंबेची आळवणी, प्रार्थना अगदी सरळसरळ आणि प्रत्यक्षस्वरूपाची आहे. ज्या दैत्यांच्या विरुद्ध देवीची प्रत्यक्ष मदत मागितली आहे, ते दैत्य दुसरे-तिसरे कोणी नसून योग्याच्या आध्यात्मिक प्रगतिपथावरील उच्च अवस्थेत बाधा आणून, योग्याच्या मार्गात अडथळे आणून तो मार्ग घेरून टाकणारे शत्रू (दुष्ट प्रवृत्ती) आहेत. कथेच्या या भागाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत–

देवीच्या सौंदर्याचे वर्णन ऐकल्यानंतर तिला जिंकून आपली राणी बनविण्याची प्रबळ इच्छा शुंभाच्या मनात निर्माण होते. हे कशाचे द्योतक आहे? यातून काय सूचित होते? आध्यात्मिक सामर्थ्य (शक्ती) प्राप्त करीत असताना योगी जेव्हा जागृतीच्या (जाणिवेच्या) आत्यंतिक श्रेष्ठ पातळीवर पोहोचतो, प्रवेश करतो,

त्याच्या मार्गामध्ये असे न दिसणारे अदृश्यस्वरूपाचे धोके निर्माण होतात. जर त्याच्या व्यक्तिमत्त्वात (अंतरात) एखादी महत्त्वाकांक्षा सुप्तावस्थेत राहिली असेल तर ती अशावेळी उसळी मारून वर येते अथवा जागृत होते. अशावेळी त्याला प्राप्त झालेल्या या आध्यात्मिक शक्तीवर पकड मिळविण्याचा, ताबा मिळविण्याचा जबरदस्त मोह होतो आणि त्या शक्तीचा वापर स्वत:च्या वैयक्तिक स्वार्थासाठी, समाधानासाठी अथवा स्वत:च्या श्रेष्ठत्वाची प्रशंसा करावी असे वाटायला लागते. हा एक प्रकारचा सूक्ष्म स्वरूपाचा अहंकार आणि महत्त्वाकांक्षा उच्च पातळीवर पोहोचल्यावर निर्माण होते. शुंभ हा दैत्य या सूक्ष्म पातळीवर निर्माण झालेल्या अहंकाराचे आणि महत्त्वाकांक्षेचे रूपक आहे; प्रतीक आहे.

कथेतील देवीच्या व्रताचा अर्थ एवढेच सूचित करतो की, "जो कोणी या अहंकाराचा नाश करण्यास समर्थ होतो तोच या आध्यात्मिक शक्तीचा वापर करण्यास योग्य ठरतो." जर योगी या मोहाला बळी पडला अथवा शरण गेला आणि त्याचा अहंकार अजूनही सामर्थ्यशाली आणि कार्यक्षम असला तर या शक्तीशी त्याचा संघर्ष तयार होतो आणि त्याचा अहंकार नष्ट होईपर्यंत त्याला या आध्यात्मिक शक्तीशी सामना करणे, संघर्ष करणे अटळ ठरते, भाग पडते. परंतु त्यांची योग्य-अयोग्य भेद जाणण्याची बुद्धी, कुवत जर पुरेशी प्रगत असेल, विकसित झालेली असेल आणि तो कोणत्याही मोहाला बळी पडत नसेल, शरण जात नसेल तरीसुद्धा या सूक्ष्म अहंकाराचे कारण असलेल्या भ्रमावर, मायेवर वरचढ होण्यासाठी, श्रेष्ठत्व मिळविण्यासाठी त्याला या आध्यात्मिक दैवी शक्तीची अजूनही गरज भासते. तेव्हा आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, या दोनही बाबतींत शेवटी सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक स्वरूपाची दैवी शक्तीच अहंकार (गर्व) नष्ट करते आणि योग्याला संसाराच्या मायाजालातून (भौतिक अस्तित्वातून) मुक्त करते. खरं पाहिलं तर हा 'अहं', किंवा आध्यात्मिक अहंकारच एक प्रकारच्या 'अस्मितेची' (निराळ्या अस्तित्वाची) जाणीव निर्माण करतो. त्यामुळे दैवी जाणिवेचे, जागृतीचे मुख्य केंद्रच तो आच्छादून टाकतो, झाकून टाकतो. या 'अहं'चा नाश म्हणजे मुख्य केंद्र सोडून त्याच्याभोवती निर्माण झालेल्या परिघाचे अदृश्य होणे, नाहीसे होणे होय.

'अहं' स्वरूपाच्या जाणिवेचा नाश होण्यापूर्वी इतरही अनेक प्रवृत्ती योग्याच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण करून तो रस्ताच बंद करतात. या प्रवृत्तींचे स्वरूप शृंखलांसारखे, बेड्यांसारखे असते. या बेड्या, या शृंखला प्रथम नष्ट करणे अत्यंत जरुरीचे असते. या कथेमध्ये देवीशी लढाई करण्यासाठी शुंभाने पाठवलेले सैन्य हे या बेड्यांचे, शृंखलांचे प्रतीक आहे, रूपक आहे. तो स्वत: रणांगणावर येण्यापूर्वी प्रथम सैन्य पाठविण्याची योजना करतो. या सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या दैत्य सेनापतींची नावेपण अतिशय अर्थपूर्ण आणि सूचक स्वरूपाची आहेत. उदाहरणार्थ, धूम्रलोचन, चंड-मुंड, रक्तबीज इत्यादी. या नावांचा संबंध आपल्याला काही विशिष्ट प्रवृत्तींशी जोडता येतो. सर्व तऱ्हेच्या आसुरी प्रवृत्तींचे नेतृत्व करण्यात ते कुशल आहेत. मुक्तिपथावर प्रगती करण्याचा प्रयत्न करणाऱ्या योगसाधकाच्या मार्गात अशा प्रवृत्ती फार मोठे अडथळे निर्माण करतात. परंतु योग्यामध्ये वास करणाऱ्या दैवीशक्तीच्या सामर्थ्याने अशा आसुरी प्रवृत्तींचा सहज धुव्वा उडतो. हा सर्व लढा, हा सर्व संघर्ष योग्याच्या अंतर्मनातच चाललेला असतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

या दुष्ट प्रवृत्तींच्या नाशानंतर त्यांच्या बंधनातून तो मुक्त झाल्यावर त्याचा अंतिम लढा त्याच्या 'अहं' शी अहंकाराशी सुरू होतो. या अहंकाराचे विसर्जन झाल्यानंतर, सर्वनाश झाल्यानंतरच तो खऱ्या अर्थाने त्याच्या शुद्ध जाणिवेसह, जागृतीसह दिव्य जाणिवेशी, आध्यात्मिक शक्तीशी एकरूप होतो. त्या शक्तीशी त्याचे मीलन होते. त्यानंतरच ईश्वरी इच्छापूर्तीच्या कार्याचा हेतू, आकृतिबंध पूर्ण करण्याच्या दृष्टीने तो खऱ्याखुऱ्या आध्यात्मिक शक्तीचे शक्तिशाली साधन बनतो. त्याच्या माध्यमातून ईश्वरीशक्ती कार्यान्वित होते. ईश्वरीशक्तीच्या या महान कार्याचा महत्त्वाचा हेतू, ध्येय आणि वैशिष्ट्य देवीच्या उद्गारात दिसून येते. शुंभाच्या उद्धट आणि गर्वयुक्त मागणीला तिने दिलेले उत्तर अत्यंत सडेतोड आणि अर्थपूर्ण आहे. ती म्हणते, "आपल्या सर्वश्रेष्ठ शक्तिसामर्थ्याच्या जोरावर जो मला जिंकेल त्याच्याच हातात मी माझा हात देईन."

तिसऱ्या कथेच्या भागातील आणखी एक सुरस असा दुसरा मुद्दा म्हणजे काही दैत्यांना ठार मारताना देवीने केलेले विशिष्ट आवाज! आध्यात्मिक साधनेमध्ये मंत्राचा वापर अथवा काही विशिष्ट स्वरांचे मिश्रण प्रसिद्ध आहे. योगसाधनेमध्ये असे मंत्र किंवा गूढ बीजमंत्रांचा वापर काही विशिष्ट प्रवृत्ती नाहीशा करण्यासाठी अथवा जागृतीच्या काही अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी वारंवार केला जातो. याशिवाय दीक्षा प्रदान करतानासुद्धा साधकाच्या जागृतीची व्याप्ती तात्पुरत्या स्वरूपात घडविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठीसुद्धा काही स्वर अथवा स्वरांचा समुच्चय वापरला जातो. पण या सर्व गूढ गोष्टी अत्यंत गुप्त स्वरूपात कटाक्षाने राखल्या जातात. तसे करणे नैसर्गिकच असते. आध्यात्मिक प्रगतीचा एक विशिष्ट टप्पा गाठल्यानंतर त्यासाठी त्याची विशिष्ट मानसिक तयारी झाल्याशिवाय कोणालाही त्या मंत्रांचे अथवा स्वरांचे ज्ञान दिले जात नाही. त्याला ते माहीत असणे अपेक्षितच नसते. देवीच्या नुसत्या 'हूं' या हुंकाराच्या आवाजाने धूम्रलोचनाचा नाश झाला. तर तिच्या प्रत्येक श्वासागणिक होणाऱ्या आवाजातून लढणारे योद्धे तयार झाले. देवीने भोसकलेल्या दैत्यांचे रक्त प्राशन करतानासुद्धा कालीने मोठमोठे निनाद केलेले आहेत.

दैत्यांच्या संहाराचे भीषण स्वरूप त्या भयानक निनादांनी अधिकच भीषण झाले.

सर्व देवांच्या तेजापासून देवीचे नारीरूप प्रगटल्यानंतर सर्व देवांनी तिला निरनिराळे अवयव, आभूषणे आणि शस्त्रे दिली. तिची पूजा केली, प्रार्थना केली. त्यावेळी देवीने खदखदा केलेल्या हास्याच्या निनादाने सर्व ब्रह्मांड भरून गेले. युद्धाच्या वेळी तर तिच्या हास्याच्या आवाजाने पर्वत कंपित झाले, भूमंडळही डळमळले. समुद्र थरथरायला लागले.

यानंतर कथेचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भाग आपल्यासमोर येतो. चंड-मुंड या दैत्यांचा वध झाल्यानंतर शुंभाने रक्तबीजाच्या आधिपत्याखाली आणखी मोठी सेना पाठवली. युद्ध सुरू होण्यापूर्वी सर्व देवांनी त्यांच्या विशिष्ट शक्ती देवीच्या मदतीला दैत्यांचा बिमोड करण्यासाठी पाठविलेल्या होत्या. उदा. ब्रह्माची ब्रह्माणीशक्ती, इंद्राची इंद्राणी, विष्णूची वैष्णवी, नृसिंहाची नारसिंही इत्यादी. या प्रसंगी या शक्तींनी त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्व वेगळ्या स्वरूपात राखले, शिल्लक ठेवले होते. महिषासुराचा वध झाला. त्यावेळच्या प्रसंगी त्या जशा मिळून गेल्या तशा त्या तिसऱ्या भागात मिळून गेलेल्या नाहीत. याचा अर्थ काय असेल? अर्थ उघड आहे– कथेच्या तिसऱ्या भागाचे वैशिष्ट्य म्हणजे साधकाला आपल्या क्षुद्रदर्जाचे व्यक्तिमत्त्वपूर्ण प्रभुत्व आणि नियंत्रण राखणे साध्य झालेले आहे. योग्याला इतर यौगिक सिद्धी वापरून इतर दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्याची योग्यता, सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. आता त्याला सर्वसाधारण शक्तीवर पूर्णपणे अवलंबून राहण्याची गरज भासत नाही. साधकाने आध्यात्मिक प्रगतीचा एक विशिष्ट टप्पा गाठल्यानंतरच मोक्षप्राप्तीसाठी साधना चतुष्टयाच्या (साधनेच्या चार मार्गांचा) यौगिक शक्तींचा पद्धतशीर वापर करण्याची परवानगी त्याला दिली जाते, हे सर्वश्रुतच आहे.

या संदर्भात लक्षात घेण्याचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे देवीने शुंभाला दिलेला पर्याय! सर्व देवांना स्वर्गाचे राज्य दिल्यानंतर तिने शुंभाला पाताळात जाण्याची आज्ञा दिलेली आहे. हे केले तरच तो जिवंत राहू शकणार आहे. नाहीतर त्याचा विनाश अटळ आहे. या महत्त्वपूर्ण पर्यायाचा अर्थ काय आहे? योग्याला आपल्या अहंकाराचा नाश करण्यासाठी आणि मुक्ती मिळविण्यासाठी अगदी शेवटच्या पायरीपर्यंत जाण्याची गरज नाही. त्याची जर इच्छा असेल तर तो व्यक्तिमत्त्व अलग (निराळे) राखू शकतो आणि क्षुद्र सिद्धींचा उपयोगही करू शकतो. पण त्याला जर मोक्ष हवा असेल आणि सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक शक्ती हवी असेल (ही सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक शक्ती अंतिम मुक्तीबरोबरच मिळते.) तर मात्र त्याचे निराळे, अलग स्वरूपाचे व्यक्तिमत्त्व अथवा त्याचा अहंकार नाहीसाच झाला पाहिजे. हा अहंकार नाहीसा होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याला दुसरा पर्यायच नाही.

हा 'अहं', या अहंकाराचा नाश कसा होतो याची कल्पना दुर्गासप्तशतीमध्ये देवी आणि शुंभाच्यामध्ये शेवटी झालेल्या घनघोर लढ्याच्या वर्णनातून मिळते. 'देवीने तिच्या सर्व निरनिराळ्या शक्ती परत तिच्यामध्येच विलीन केल्या, अंतर्भूत केल्या.' या तिच्या कृतीचा हेतू काय? याचा अर्थ काय? ही गोष्ट काय सूचित करते? आत्मसाक्षात्कार होण्यापूर्वी शेवटच्या अवस्थेला अहंकाराचा संपूर्ण विनाश होण्याच्यावेळी फक्त दैवी आध्यात्मिक शक्तीच तिच्या अत्यंत शुद्ध स्वरूपात कार्यान्वित होते. त्याक्षणी तिच्या निरनिराळ्या स्वरूपांपैकी एकाही स्वरूपाच्या कार्याची, कृतीची गरज नसते.

आता हा अगदी निकराला पोहोचलेला लढा अत्यंत सूक्ष्म, तरल आणि उच्चतम पातळीवर पोहोचलेला आहे. अशा स्वरूपाची अवस्था निर्माण होणे अपेक्षितच आहे. ही सूचनासुद्धा देवीशी लढताना शेवटचा मार्ग म्हणून शुंभाच्या आकाशात उडण्याच्या कृतीत आणि तिथून देवीवर हल्ला चढविण्याच्या कृत्यातून मिळते. 'आकाश'तत्त्व हे पंचमहाभूतांतील अत्यंत तरल आणि सूक्ष्म स्वरूपाचे तत्त्व आहे. या दृश्यसृष्टीचे कार्य पंचमहाभूतांमुळेच सुरळीत चालू शकते. 'शेवटच्या निकराच्या अवस्थेला आलेले युद्ध 'आकाशात' लढले गेले.' याचा यौगिक अर्थ असा आहे की, आता योग्याच्या अहंकाराचा जोर लक्षणीयरीत्या (प्रगत स्वरूपात) बराच कमी झालेला आहे. त्याचा संपूर्ण विनाश होण्यापूर्वी त्याचे रूपांतर, त्याचा आकार अत्यंत सूक्ष्मतम अशा मूळ स्वरूपात होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आवश्यक आहे. त्याप्रमाणे शुंभाचे संपूर्ण निर्दालन त्याच्या अहंकाराच्या निर्दालनासह झालेले आहे. योग्याला ईश्वरी दिव्य स्वरूपात मिसळून जाण्यासाठी अशा स्वरूपाच्या संपूर्ण 'अहं' च्या विनाशाचीच गरज आहे, यात वादच नाही.

या रूपकात्मक (प्रतिकात्मक) कथेतील शेवटचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजा सुरथाला आणि वैश्याला देवीने जे वर बहाल केले त्या दोन वरांचे वेगळेपण, त्यांचे निरनिराळे स्वरूप आणि अर्थ हे होय. मोक्षमुक्तीची प्राप्ती झाल्यानंतर आत्मसाक्षात्कारी योग्याच्या पुढे दोन प्रकारच्या मार्गांचे अस्तित्व निर्माण होते. ज्या जगावर, ज्या लोकावर त्याने प्रभुत्व मिळविलेले असते त्याच जगाकडे एक मार्ग जाणारा असतो. त्या मार्गाने जाऊन खालच्या जगातील ईश्वरी कार्य पूर्ण करण्याची योजना चालू ठेवणे आणि माया, मोह, भ्रांतीच्या प्रांतात, मर्यादित क्षेत्रात लडबडलेल्या, धडपड करणाऱ्या आपल्या बांधवांना मदत करणे, त्यांना मुक्तीचा मार्ग दाखवणे, आध्यात्मिक प्रगतीसाठी मार्गदर्शन करणे. दुसरा मार्ग या दृश्य स्वरूपाच्या कनिष्ठ जगातून त्याला बाहेर नेणारा असून आध्यात्मिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कार्य करण्याची संधी देणारा आहे. या मार्गाबद्दल सर्वसामान्य मानवांना कसलीही कल्पना नसते.

अशा रीतीने दुर्गासप्तशतीचे पठण करताना त्यातील गूढार्थ,

प्रतीके, रूपके डोळसपणे समजावून घेतली, त्यांचा नीट अभ्यास केला तर सप्तशतीच्या साधकांनां आध्यात्मिक प्रगतिपथावर बहुमोल मार्गदर्शन मिळेल आणि त्यांच्या मनोवांछित आकांक्षा फलदायी होतील यात तिळमात्र संदेह नाही.

या ग्रंथात वर्णन केलेल्या आदिशक्तीचे, महामायेचे स्वरूप किंवा देवी म्हणजे साक्षात अखिल ब्रह्मांडे व्यापून उरणारी 'चित्शक्ती'च आहे. ऋग्वेदातील १० व्या मंडलातील 'देवीसूक्त' साक्षात जगदंबेच्या मुखातून म्हटले गेलेले आहे. त्यामध्ये या चित्शक्तीच्या स्वरूपाचे आणि कार्याचे वर्णन केलेले आहे. एकूण आठ ऋचा असलेल्या या सूक्ताचा प्रभाव फार जबरदस्त आहे. त्यामध्ये जगदंबेचे विश्वव्यापक स्वरूप तिच्या मुखातूनच व्यक्त करताना ती म्हणते, "मी अकरा रुद्र, आठ वसू, बारा सूर्य आणि विश्वदेव यांच्या समवेत त्रिभुवनात संचार करते. वरुण, इंद्र, अग्नी आदि देवतांना धारण करते.

सोम उत्पन्न करणारा, त्वष्टा, पूषा आणि भग यांना पण मीच धारण करते. हविर्द्रव्य अर्पण करून आणि सोमरसाने देवांना संतुष्ट ठेवणाऱ्या यजमानाचे यज्ञरूपी फळ मीच धारण करते.

मी उपासकांना धनप्राप्ती देणारी, यज्ञाची अधिष्ठात्री जगत्स्वामिनी आहे. विविध रूपांनी नटलेल्या आणि भूतमात्रात प्रविष्ट होणाऱ्या मला देव सर्व प्रकारांनी भजतात. मला सत्यार्थाने न जाणणारे संसाराला पारखे होतात. जो मला आपलासा वाटेल त्यालाच मी प्रगल्भ, ब्रह्मज्ञानी, त्रिकालदर्शी आणि बुद्धिवान असे घडवते. मनात ब्रह्मद्वेष बाळगणाऱ्या हिंसकास नष्ट करण्यासाठी रुद्राचे धनुष्य सज्ज करते आणि स्वर्गातून पृथ्वीमध्ये प्रवेश करून भक्तजनांच्या रक्षणासाठी शत्रूशी युद्ध करते. परमेश्वराच्या मस्तकावरील आकाशाची निर्मिती मीच करते. अथांग परमात्मरूपी सागर हे माझे उत्पत्तिस्थान आहे. सर्व विश्व व्यापून उरलेल्या स्वर्गासही मी स्पर्श करते. वायूप्रमाणे माझा सर्वत्र संचार असून माझे माहात्म्य स्वर्गापेक्षा आणि पृथ्वीपेक्षा श्रेष्ठ स्वरूपाचे आहे."

अशा या भव्य चित्शक्तीला अत्यंत नम्रभावाने नतमस्तक होऊन, साधकाने शरण जाऊन आपला उद्धार सर्वार्थाने करून घेणे हीच त्याच्या जीवनाची सांगता आहे. अशा परमेश्वराला शरण जाताना मुखातून शब्द येतात–

***प्रणतानां प्रसीदत्वं देवि विश्वार्तिहारिणी ।***
***त्रैलोक्यवासिनामीड्ये लोकांना वरदा भव ।।***

अखिल विश्वाची पीडा हरण करणाऱ्या व त्रैलोक्यात वास करणाऱ्यांना स्तवनीय अशा हे देवी, भक्तीने विनम्र झालेल्या भक्तांवर तू प्रसन्न हो. सर्व लोकांना वर देणारी हो.

संदर्भ : I. K. Taimni Introduction to Hindu symbolism

❖❖❖

## नवरात्र-शतचण्डी हवन

### (श्री सद्गुरू स्वामी - जगदंबा ऐक्यभाव)

"करतील जे माझे अखंड चिंतन योगक्षेम त्यांचा वाहीन"
धन्य झाले, आज अनुभवले स्वामींचे चिरसत्य वचन
श्री स्वामीकृपेचा लाभ होऊनी फळास आली उपासना
सप्तशती शतचण्डी हवने पूर्ण झाली मनोकामना
आशीर्वाद स्वामींचा मिळता जगदंबा आज आली घरा
भाग्यक्षणी या मंगलदिनी झुळझुळला दिव्यानंद झरा
जगदंबेचे स्वागत करण्या जमले सारे साधक
नतमस्तक हात जोडूनी 'उदोकार' गर्जती भाविक
शंख तुताऱ्या गर्जू लागल्या सूर मंगल सनईचे
मधुर स्वरांनी कंपित झाले जीवन साऱ्या विश्वाचे
माला पुष्पे मम गृहही सजले, नवतोरण दारी आम्रपल्लवांचे
ॐ श्री स्वस्तिक चिन्हे शुभ अती, पद्मचक्र अन् सोनपाऊले
नाजूक रेखीव रंगावलीने अंगण माझे पवित्र झाले
सुवासिनींचा मेळा जमला औक्षणास जगदंबेला
सुवर्णसिंहासनी आरूढ होता धूप, दीप, नैवेद्य अर्पण मातेला
उच्च आसनी स्वामी बैसूनी पाहती मंगल सोहळा
दिव्य मुखावर प्रसन्न हास्य भाव अती सुंदर आगळा
यज्ञकुंड पवित्र सुशोभित रंगावली पुष्पमालांनी
साधक हवना सज्ज जाहले श्री स्वामी, कुलदेवता वंदोनी
आचमन प्राणायाम संकल्प करोनी आवाहन केले अग्नीला
गणेश गुरू वंदन करिता प्रारंभ झाला हवनाला
घनगंभीर मंत्रघोष निनादे सप्तशतीमंत्र पठणाचा
सूर ताल लय अती सुंदर रंगे स्वाहाकार पवित्र मंत्रांचा
अग्निदेव अति प्रसन्न होऊनी स्वीकारिता मंत्र आहुती
जगदंबा अन् स्वामीमुखावर आनंदाची आळी भरती
विश्वेश्वरी जगद्धात्री अंबे तू पाव आम्हां लवकरी
दैत्यनाश समूळ करोनी सत्याचा विजय विजय करी
भक्तिभावे स्मरतो तुजला मार्ग दाखवी भुक्तीमुक्तीचा
शरण आलो माते तुजला कर नाश सत्वर दंभाचा
सारे काही तुलाच अर्पण तुझ्याचसाठी हवनतर्पण
तुझ्याच चरणी माझे जीवन!

—सौ. हेमलता सुधाकर जोशी